# रूसमधील सुंदर कथा

अनुवाद

**सुप्रिया जोशी**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**रूसमधील सुंदर कथा**
अनुवाद : सुप्रिया जोशी

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
सुप्रिया जोशी
२०१७/ए ३, सुनील अपार्टमेंट
कॅनडा बँकेच्या वरील बाजूस,
राजारामपुरी, कोल्हापूर.
फोन नं. : ०२३१-२५२०९५९

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २३०/-

# कथानुक्रम


१. फ्रान्सचे राष्ट्रगीत...*(लियोनिड एन. एंड्रेइव)* ........................ ५
२. संगीत नाटक...*(एल्केंस रेमीसोव)* ................................ ९
३. बोलेसलोव...*(मॅक्झिम गॉर्की)* .................................... १४
४. द्वंद्वयुद्ध...*(निकोलाई टेलेशोव)* .................................... २१
५. बकायनचा गुच्छ...*(अलेक्झांडर आय. कुपरिन)* .................. २८
६. हँसी ...*(लियोनिड एन. एंड्रेइव)* .................................. ३५
७. सव्वीस माणसं आणि एक मुलगी...*(मॅक्झिम गॉर्की)*.............. ४२
८. विकृत संबंध...*(युजेने एन. चिरीकोव)* ............................ ६२
९. तीन साधू...*(टॉलस्टॉय)* ........................................ ७२
१०. मोठा धमाका...*(लियोनिड एन. एंड्रेइव)* .......................... ८१
११. स्लावी आत्मा...*(अलेक्झांडर आय. कुर्पीज)* ...................... ९३
१२. सरडा...*(अँन्टॉन चेकॉव्ह)* ...................................... १०६
१३. दृश्यचित्रकाराचे प्रेम...*(स्कीटालिट्ज (ए. पेट्रोव)* ................. १११
१४. साधे लोक...*(मॅक्झिम गॉर्की)* .................................. १३४
१५. वानिया...*(मॅडम एस्टाफीवा)* .................................... १५५
१६. प्रेम शक्तिशाली आहे मृत्यूपेक्षा!...*(दमित्री एस. मेरेजकोवस्की)*.... १७२


✦✦✦

# फ्रान्सचे राष्ट्रगीत

*लियोनिड एन. एंड्रेइव*

स्वतःचे असे अस्तित्वच नव्हते त्याला – अगदीच अस्तित्वविरहित व्यक्ती. प्रवृत्ती सशासारखी भेदरट आणि कातडी बैलाची. निर्लज्ज पण तितकीच सहनशील. आमच्या आणि त्याच्या दुर्दैवामुळे आमच्या बदनाम काळ्या पंक्तीत जेव्हा त्याला बसवले गेले तेव्हा आम्ही सगळे हसलो. त्याला अगदी मूर्ख वेड्यांप्रमाणे हसलो. काही चुका इतक्या हास्यास्पद, भीषण विकट असतात ना! आम्ही हसलो– पण तो खरोखरच रडत होता. माझ्या उभ्या आयुष्यात असा क्षणोक्षणी डोळ्यांत आसवे भरणारा, जणू अवघं आयुष्य आसवातच भिजवलेला दुसरा माणूस भेटलाच नाही. तो इतकं धो धो रडायचा की, डोळ्यांसह त्याच्या नाका-तोंडातून पाणी वाहायला लागायचं.

मी आमच्या पंथातल्या लोकांना रडताना पाहिलं आहे; पण अश्रू कसले ते? ते तर नक्राश्रू. धगधगत्या ज्वालांइतके दाहक. ज्यांना बघून जंगली जनावरांनीसुद्धा पळ काढावा, इतके भयानक हे अश्रू माणसाच्या चेहऱ्याला म्हातारं बनवतात; पण डोळ्यांना तारुण्य बहाल करतात. पृथ्वीच्या पोटात लाव्हारस खदखदत असतो ना आणि एखाद दिवशी अचानक ज्वालामुखीचा उद्रेक होतो... तप्त लाव्हारस बाहेर पडतो... अगदी तसेच. होत्या नव्हत्याची राख करतात. साऱ्या इच्छा, आकांक्षा, जीवनाला भेडसावणाऱ्या छोट्या छोट्या चिंतांना गाडून टाकतात.

परंतु त्या माणसाच्या अश्रुपाताचे परिणाम फक्त लाल नाक आणि ओला रुमाल इतकेच होते. बहुतेक नंतर तो रुमाल त्याने वाळवून ठेवला असावा; कारण इथे जास्तीचे रुमाल मिळणार तरी कोठून?

बंदिवासातला सगळा वेळ त्याने अधिकाऱ्यांना धोकाच दिला होता. सगळ्या अधिकाऱ्यांना, जे त्यावेळी कामावर होते त्यांना आणि उरलेले त्याने आपल्या

कल्पनेने चितारले होते त्यांना. तो दहादा त्यांच्यासमोर झुकला, रडला, भेकला, पुन्हा पुन्हा शपथा घेतल्या त्याने, तो निर्दोष आहे म्हणून... आपले बहुमोल तारुण्य वाचवण्यासाठी त्याने दयेची भीक मागितली. भविष्यात कधीही तोंड न उघडण्याचे वचनही दिले, मी फक्त प्रशंसाच करेन अशी वारंवार प्रार्थना केली– याचना केली; पण ते बधले नाहीत. उलट आमच्यासारखे तेही हसले. त्यांनी त्याला दुःखी डुक्कर म्हणून संबोधले आणि वेळोवेळी ते जोरजोरात त्याला 'ए छोट्या डुकरा' म्हणूनच हाकारायचे. पुकारायचे.

त्यांच्या प्रत्येक बोलावण्याच्या वेळी तो अत्यंत आशेने आज्ञाधारकासारखा पळत सुटायचा. प्रत्येक वेळी आता आपली सुटका होणार, आपण मुक्त होणार याच निरोपाच्या आशेने धावायचा आणि ते त्याची खिल्ली उडवायचे. आमच्यासारखे त्यांनाही माहीत होते की, तो निर्दोष आहे; परंतु त्याला त्रास देऊन, कष्ट देऊन ते इतर बंदिवान डुकरांना घाबरवू पाहात होते. मुळातच जास्त भित्र्या असलेल्यांना आणखी घाबरवत होते.

सगळ्या प्राणिमात्रांप्रमाणे एकटेपणाची त्याला भीती वाटायची. आधारासाठी, सहवासासाठी, सोबतीसाठी तो आमच्या जवळ आला; पण मुळातच आमचे चेहरे भयानक होते, खुनशी होते आणि आता तर ते दगडासारखे कठीणही झाले होते. आम्हाला आपलंसं करण्याची एक किल्ली त्याला सापडली. अगदी घाबरत, चाचरत त्याने आम्हाला हाकारले, ''प्रिय मित्रांनो, माझ्या साथीदारांनो!'' आणि आपलं डोकं हलवत आम्ही त्याला म्हणालो,

''लक्ष दे नीट, ते आपल्या गोष्टी ऐकत आहेत.''

तो हळूच उठायचा, चोरून दरवाजाकडे बघायचा... भित्र्या काळजाचं ते केविलवाणं छोटं डुक्कर. ठीक आहे आणि मग आम्हाला हसू फुटायचं. आम्ही सगळे मिळून जोरजोरात हसायचो. त्याची चेष्टा करायचो. तरीसुद्धा त्याने धाडस दाखवलं आणि आमच्या शेजारी बसून रडत रडत त्याने घराकडच्या गोष्टी सांगायला सुरुवात केली. त्याच्या घरात असलेल्या त्याच्या आवडत्या पुस्तकांबद्दल सांगितले, आपल्या आई आणि भावाबद्दल बोलताना त्याच्या मनात भय आणि दुःख दाटून आले; कारण ती दोघं जिवंत आहेत की, मरून गेली आहेत हेही त्याला ज्ञात नव्हते.

शेवटी आम्ही सोडून दिलं त्याला.

जेव्हा दुष्काळ पडला, तेव्हा तो व्याधिग्रस्त झाला... भयंकर रोगाने ग्रासले त्याला. तुम्हाला माहीत आहे का, तो डुक्कर खाण्याचा खूप शौकीन होता. आपल्या साथीदारांना आणि अधिकाऱ्यांना तो खूप खूप घाबरायचा. अत्यंत व्यग्रतेने तो आमच्याकडे रोखून रोखून बघायचा आणि नेहमीच आपल्या रुमालाने कपाळावरचा घाम टिपायचा. कधी डोळ्यांतले अश्रू पुसायचा. अत्यंत अधीरतेने आम्हाला विचारायचा, ''खूप दिवस तुम्हाला अन्न मिळालं नाही, उपासमार झाली तर भुकेने मरून जाल तुम्ही?''

''खूप काळ तसं झालं तर.'' मी उत्तर दिले.

''आणि तुम्ही चोरून वगैरे गुपचूप पण काही खाणार नाही?''

''बहुधा आमच्या घरून आई केक वगैरे पाठवेल.'' मी त्याला गंभीरपणे सहमत होत म्हणालो. त्याने संशयाने माझ्याकडे पाहिले, मुंडी हलवली आणि सुस्कारे टाकत तो निघून गेला. पुढच्या दिवशी अचानक चुरुचुरु बोलणाऱ्या पोपटाप्रमाणे त्याने घोषणा केली.

''माझ्या प्रिय साथीदारांनो, मी पण तुमच्याबरोबर भुकेनेच मरणार.''

नेहमीप्रमाणे आम्ही उत्तरलो,

''तू एकटाच मर, भुकेने व्याकूळ होऊन.''

आणि तो उपासमारीने मेला, आमचा त्याच्यावर विश्वासच बसायला तयार नाही. आम्हाला असंच वाटायचं की, तो गुपचूप चोरून काहीतरी खात असेल. पहारेकऱ्यांना पण तसंच वाटलं. भुकेने व्याकूळ होऊन त्याला खूप ताप भरला. आम्ही फक्त आमचे खांदे झटकले आणि पुटपुटलो, ''बिच्चारं छोटं डुक्कर!''

आमचाच एक साथीदार होता, कधीही न हसणारा. तो आम्हाला म्हणाला, ''तो आपला साथीदार होता, चला आपण त्याच्याजवळ जाऊया.''

तो बेशुद्ध होता, त्याचे चिरचिरणे त्याच्या जीवनाप्रमाणे मुके, मुके झाले होते. त्याच्या लाडक्या पुस्तकांच्या गोष्टी, आई आणि भावंडांबद्दलच्या त्याच्या गोष्टी, केकसाठी त्याने केलेली विनवणी, निर्दोष असल्याचा वारंवार त्याने दिलेला निर्वाळा, क्षमेसाठी-दयेसाठी केलेली प्रार्थना सगळंच मुकं झालं होतं. आपल्या जन्मभूमीला त्याने आर्त साद घातली होती. फ्रान्स जन्मभूमीला हाक दिली होती. त्या दुबळ्या मनुष्याच्या हृदयावर दैवी प्रकोपाची कुऱ्हाड कोसळली होती. त्याच्या आत्म्याच्या चिंध्या चिंध्या झाल्या होत्या.

जेव्हा तो मरण पावला तेव्हा आम्ही आमच्या बराकीत होतो. ज्योत विझायच्या आधी काही काळ थोडी मोठी होते, त्याप्रमाणे मरायच्या आधी काही वेळ तो शुद्धीवर आला होता. अत्यंत शांतपणे तो झोपला होता. अशक्त आणि दुर्बल! आम्ही सगळेच त्याच्या अवतीभोवती उभे होतो. तो काय म्हणाला ते आम्ही सगळ्यांनी ऐकलं...

''जेव्हा मी मरेन, तेव्हा माझ्यासाठी फ्रान्सचं राष्ट्रगीत म्हणा.''

''अरे अरे, असं काय बोलतोस तू?'' आम्ही थोड्या प्रसन्नतेने आणि थोडंसं रागावून त्याला म्हणालो. त्याने परत तेच शब्द उच्चारले,

''जेव्हा मी मरेन, तेव्हा माझ्यासाठी फ्रान्सचं राष्ट्रगीत म्हणा.''

पहिल्यांदा असं झालं की, त्याचे डोळे कोरडे ठक्क होते आणि त्याला शेवटचा निरोप देताना आमचे डोळे पाणावले होते. पश्चात्तापाच्या दाहक अश्रूंनी आम्ही भाजून निघत होतो. ती आग इतकी भयानक होती की, जंगली पशूंना पण तिने पळवून लावले असते.

तो मरून गेला आणि आम्ही त्याच्यासाठी फ्रान्सचे राष्ट्रगीत म्हटले. अगदी खणखणीत आवाजात, जोषात, तरुण दमदार आवाजात आम्ही स्वातंत्र्याचे महान गीत गायिले. शक्तिशाली अथांग समुद्राने फ्रान्सकडे वाहत जाणाऱ्या आपल्या उंच लाटांनी त्या गीताला साथ दिली. आमचे समर्थन केले. समर्थन केले आमच्या सद्य:स्थितीचे, आमच्या वर्तमानाचे, आम्ही भोगलेल्या हालअपेष्टांचे, आमच्या पिचून पिसून करपून गेलेल्या आशा आकांक्षांचे. त्याची आठवण आमच्यासाठी नेहमीच ताजी आणि प्रेरणादायीच असेल. त्याची अस्तित्वहीनता – त्याचं सशाचं शरीर आणि माणसाचा महान आत्मा. त्या महानायकासमोर आमच्या साथीदारांनी– मित्रांनी गुडघे टेकले.

आम्ही गातच राहिलो, आमच्यावर बंदुका रोखलेल्या होत्या. त्यांचे घोडे अत्यंत भयानकतेने चमकत होते, परत तीव्र संगिनींनी आमच्याकडे तोंड केले आणि आमच्या सशक्त गीताचे स्वर अधिकच टिपेला पोहोचले. आमच्या कोमल हातांनी त्याच्या काळ्या कफनासह त्याला हळूहळू कबरीत दफन केले.

आम्ही फ्रान्सचे राष्ट्रगीत गायिले!

✦✦✦

# संगीत नाटक

*एल्केंस रेमीसोव*

धुळीने माखलेली, थंड सकाळ होती ती.

कामात व्यस्त असलेला शिपाई भसाभस जांभया देत, रजिस्टरची पाने उलटत-पालटत होता. तो पेंगुळला होता आणि चिडचिडला होता, वैतागला होता.

टेलिफोनची घंटी अव्याहत वाजत होती. त्याच्याजवळ उभा असलेला सार्जंट खाली बसला आणि म्हणाला, ''आगीच्या संबंधातले कागदपत्र कुठे आहेत? तमगोंचं बक्षीस... हो हो तमगे... ए...?''

भरपूर ओझ्याच्या भाराने वाकलेला पोस्टमन आत आला आणि भुरकट, बारीक कटिंग केलेल्या केसांच्या लिपिकाने आलेली पत्रं तपासून पाहिली.

''हे पार्सल आमच्यासाठी नाहीए!'' हे तोंडातल्या तोंडात पुटपुटला. थोडं नाकातच बोलला, ''आमच्यासाठी नाहीए.''

''नवाब साहेब!'' मागच्या दरवाजातून आवाज आला, ''थोडी तरी दया दाखवा, याचा तिसरा महिना आहे हा!''

''तू काय स्नेगोव आहेस का?'' सार्जंटने विचारले. जणू काही तो फोनवरच बोलत होता, ''जाऽ जाऽ, तिकडे काउंसिल चेंबरमध्ये जा. तिथेच थांब आणि वाट पाहा. थोडीफार अधिक प्रतीक्षा केलीस तर झिजणार नाहीस तू!''

मागच्या बराकीत कोणीतरी माऊथ ऑर्गन वाजवत होता, बग्गी/छकड्याचे घोडे अधूनमधून लाथा झाडत होते, त्याचा धडाम धडाम आवाज येत होता.

काळे, भुरे ढग अधूनमधून सूर्याला झाकोळत होते. थोडा वेळ सोनेरी होऊन परत काळे भुरे होऊन पुढे जात होते.

कोणीतरी परत किंचाळले.

''थांब जरा, तो येईलच लगेच.'' याचकाला (अर्जदाराला) निरीक्षकाच्या खोलीत पाठवता पाठवता एक शिपाई खेकसला.

चर्चच्या घंटा वाजत होत्या, त्यांचा लयबद्ध गंभीर नाद वातावरणाला अधिकाधिक उदास बनवत होता.

नक्कीच कोणावर तरी अंतिम संस्कार झाले असावेत. स्लोकिन विचारात पडला. नाहीतर चर्च कधीचंच बंद व्हायला हवं. आपल्या सुस्थितीतील, प्रतिष्ठित घरातल्या गज बसवलेल्या खिडकीतून दृष्टी दूर करून सगळ्या भिंतीकडे तो परत परत पाहात राहिला. जोपर्यंत कुसकोक जादूगार लिहिलेलं दिसलं नाही तोपर्यंत पाहात राहिला. चालत्या-फिरत्या संगीत नाटक मंडळींच्या खेळाची लाल जाहिरात त्याने पुन्हा एकदा वाचली.

घाबरून त्याने स्वतःचे स्वतःला जरा मोकळे करून घेतले, हात-पाय जरा सैल सोडले, करायला काहीच नाही याचा विचार त्याच्या मनात आला आणि त्याने कुत्र्यासारखी एक जांभई दिली.

तुटकं-फुटकं-मोडकं लंगडं जीर्ण स्टूल मागे पुढे झुललं.

स्लोकिनला अगदी सुरुवातीपासून घडलेली प्रत्येक गोष्ट आठवायला लागली. केवळ कालची दुर्दैवीरीत्या संपलेली संध्याकाळच नाही, तर सेंट पीटर्स बर्गमधल्या अगदी सुरुवातीच्या वर्षापासून त्या वेळेपर्यंत... जेव्हा दैत्यांनी त्याला पकडलं आणि अतिशय तुच्छ अशा कोठडीत बंदिवासात टाकलं. अशा तऱ्हेने वाट बघण्यात त्याने खूप वेळ घालवला होता. जोपर्यंत न्यायाधीश येऊन न्यायनिवाडा होत नाही, ते त्यांचा निर्णय जाहीर करत नाहीत तोपर्यंत त्याला बंदिवासात त्या मोडक्या डुगडुगत्या स्टुलावर बसावे लागेल... किंवा स्वतंत्रपणे दुःखी, एकाकी रस्त्यांवरून भटकावे लागेल.

अनेक जण ओळखायचे स्लोकिनला. एक चांगला शिक्षक म्हणून त्याचे नाव होते. विशेषतः अभ्यासात गती नसलेल्या मुलांच्या मातांचा मोठा वर्ग त्याचा चाहता वर्ग होता. कारण ज्या ज्या मुलांना तो शिकवायचा, ती मुलं उत्तम यश मिळवून पुढच्या श्रेणीत जायची. त्याचा पूर्वेतिहास कोणालाच माहीत नव्हता; पण त्याबद्दल कोणी चर्चाही करत नव्हते. लोक खूप सहानुभूतीने पाहायचे त्याच्याकडे; इतके की अगदी खराब हवामानात एखाद्याचा ओव्हरकोट चोरीला जावा असंच सगळ्यांना वाटायचं. बिना ओव्हरकोटचाच तो सगळीकडे फिरायचा. त्याची भिजलेली पँट पायांना घट्ट चिकटून बसायची आणि अगदी उत्तम हवामानातसुद्धा खात्रीने पाऊस त्याला भिजवायचाच.